घरच्या खालावलेल्या परिस्तिथीमुले, खूप इच्छा असूनही, बाबूजींना हवं तसं शिक्षण घेता आलं नाही. ते जेमतेम आपलं शालेय शिक्षण पूर्ण करू शकले. प्रत्याक्षात त्यांनी मोठेपणी इंजिनियर होण्याचं स्वप्न बघितलं होतं, पण परिस्थितीमुळे त्यांना ते शक्य झाले नाही. मग त्यांनी पुढे आपल्या मुलाला इंजिनियर करून आपली उच्च शिक्षणाची इच्छा अंशतः पुरी करून घेतली.

संगीत शिक्षण

बाबूजींना लहानपणापासून शास्त्रीय संगीताची आवड होती, त्यामुळे त्यांनी त्याकाळचे कोल्हापूरचे अतिशय प्रसिद्ध शास्त्रीय संगीत गायक गायनाचार्य पं. वामनराव पाध्ये यांच्याकडून काही वर्षे शास्त्रीय संगीत गायनाचं विधिवत प्रशिक्षण घेतलं. पाध्येबुवांची शिकवण्याची हातोटी इतकी विलक्षण होती की अल्पावधीतच बाबूजींनी शास्त्रीय संगीतात चांगले प्रावीण्य मिळवलं. त्यांच्या संगीताचा मूळ पाया भक्कम झाला. त्यानंतर बाबूजींनी बाबुराव गोखल्यांनी सुरू केलेल्या 'महाराष्ट्र संगीत विद्यालयात' काही काळ शिक्षण घेतलं. पण त्याचा त्यांना तितकासा फायदा झाला नाही. मग

बाबूजींनी कुणाहीकडे संगीताचं शिक्षण न घेता एकलव्यासारखं शिष्यत्व आरंभलं. स्वतःच इतर गायकांची गाणी ऐकून आपली गायकी फुलवत नेली. बालगंधर्व, हिराबाई बडोदेकर आणि के. एल. सैगल त्यांचे विशेष आवडते गायक. त्यांच्या रेकॉर्ड्स ऐकून त्यांनी त्यांच्या गायकीचा सखोल अभ्यास केला. त्या तिघांनाही बाबूजी गुरुस्थानी मानत.

स्वतःतील कलागुणांची पहिली जाण

बाबूजी गायनाचार्य पं. वामनराव पाध्ये यांचे लाडके विद्यार्थी होते. बाबूजींच्या संगीतक्षेत्रात होत असलेल्या प्रगतीवर ते अतिशय खुश होते. एकदा कोल्हापुरात 'गांधर्व महाविद्यालयात' एक आखिल भारतीय परिषद भरली होती. त्या परिषदेत हिंदुस्तानभरचे काही नामवंत गवई आले होते. त्या सर्वांच्या समोर पाध्येबुवांनी बाबूजींना उभं करून सांगितलं की, "हा माझा लहान शिष्य उत्तम नोटेशन करतो. जमलेल्या गवयांपैकी कोणीही काहीही गावं. दुसऱ्या क्षणी हा त्यांचा नोटेशन गाऊन दाखविलं." तेथे उपस्थित असलेल्या काही नामवंत गवयांनी निरनिराळ्या रागांतील आलाप, ताना घेतल्या व बाबूजींनी तात्काळ त्यांचं सहीसही नोटेशन गाऊन दाखवलं. पाध्येबुवांना वाटत असलेला बाबुजींविषयीचा सार्थ विश्वास त्यांनी सिद्ध करून दाखवला.

अशीच एक दुसरी घटना 'महाराष्ट्र संगीत विद्यालयात' शिकत असताना घडली. त्याकाळी कपिलेश्वरीबुवांच्या 'सरस्वती संगीत विद्यालयात' शास्त्रीय संगीताची स्पर्धा होत असे. बाबूराव गोखल्यांनी 'महाराष्ट्र संगीत विद्यालया' तर्फे बाबूजींना या स्पर्धेत भाग घेण्यासाठी पाठवलं होतं. त्या स्पर्धेसाठी परीक्षक होते प्रसिद्ध गायक अब्दुल करीम खाँसाहेब. त्यावेळी वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षी बाबूजींनी सादर केलेल्या मुलतानी रागातील एका चीजेने सभा जिंकली. बाबूजींच्या गायनशैलीने अब्दुक करीम खाँसाहेब इतके प्रभावित झाले की, भाग घेणाऱ्या विध्यार्थानं फक्त एकच गाणं सादर करायचं हा ठरलेला नियम डावलून त्यांनी स्वतः बाबूजींना दुसरं गाणं सादर करण्याची फर्माईश केली. या दोन घटनांनी बाबूजींचा आत्मविश्वास तर वाढलाच पण त्यांच्या जीवनाची दिशाही निश्चित झाली. नंतर गायन आणि संगीत हेच त्यांचं जीवनध्येय ठरलं.

संगीतकार म्हणून पहिली संधी

बाबूजी कोल्हापूरला असताना त्यांचे एक मित्र माधव पातकर, जे स्वतः एक चांगले गायक आणि कवी होते, भेटायला आले. त्यांनी येताना 'दर्यावरी नाच करी, होडी चाले कशी भिरीभिरी' हे ग. दि. माडगूळकरांचं गीत आणलं होतं. ते गीत पातकर स्वतः गाऊ इच्छित होते. त्यांनी त्या गीताला चाल लावून देण्याची बाबूजींना विनंती केली. बाबूजींनी लावलेली चाल सुरेख होती पण ती आपल्याला गाता येणार नाही हे पातकारांच्या लक्षात आलं. पण त्यांना ती चाल एवढी आवडली होती की त्यांनी बाबूजींना ती चाल ग. दि. माडगूळकर आणि एचएमव्ही कंपनीचे वसंत कामेरकरांना ऐकविण्याची गळ घातली. बाबूजींनी जेव्हा त्यांना ती ऐकवली तेव्हा कामेरकर अतिशय खूष झाले आणि त्यांनी ते गाणे बाबूजींनीच एचएमव्हीसाठी गावं असा आग्रह धरला. अशा रितीनं बाबूजींना गायक आणि संगीतकार अशी दुहेरी संधी एकदमच चालून आली. येथूनच त्यांचा आणि ग. दि. माडगूळकरांचा एकत्रित प्रवास सुरु झाला.

चित्रपट निर्माते बाबूजीबाबूजींनी, य. गो. जोशींच्या बरोबरीने भागीदारीत वंशाचा दिवा (१९४८) व विठ्ठल रखुमाई (१९५१) या दोन मराठी आणि रत्नघर (१९५५) या एका हिंदी चित्रपटाची निर्मिती केली. त्यानंतर बऱ्याच वर्षांनी १९६१ साली त्यांनी 'हा माझा मार्ग एकला' या मराठी चित्रपटाची निर्मिती केली. या चित्रपटास उत्कृष्ट मराठी चित्रपटाचं "राष्ट्रपती रौप्य पदक" देऊन गौरविण्यात आलं होतं. नंतर बाबूजींनी 'सावरकर दर्शन प्रतिष्ठान' ची स्थापना करून वीर सावरकर (२००२) या चिवत्रपटाची निर्मिती केली. बाबूजींचा हा शेवटचा चित्रपटही समीक्षकांनी वाखाणला.

बाबूजींच्या व्यक्तिमत्वाचे इतर पैलू

बाबूजी प्रखर राष्ट्रभक्त आणि राष्ट्रीय सेवा संघाचे कट्टर अनुयायी होते. त्यांनी दादरा–नगर हवेली आणि सिव्व्वासाच्या मुक्तिसंग्रामात मोठी कामगिरी बजावली होती. त्याचप्रमाणे गोवा मुक्तिसंग्रामातही त्यांनी हिरिरीने भाग घेतला होता. पोर्तुगीजांविरुद्ध लहान वयात लढा देऊन तुरुंगवास भोगणाऱ्या मोहन रानडे आणि तेलू मस्करेन्हास यांच्या सुटकेसाठी बाबूजींनी अथक परिश्रम केले.

बाबूजींचे समाजकार्य

संगीतकार आणि गायक म्हणून अतिशय व्यस्त असूनही बाबूजींनी बरंच समाजकार्य केलं होतं. देशावर जेव्हा जेव्हा भूकंप, वादळं, पूर अशा नैसर्गिक आपत्ती आल्या तेव्हा तेव्हा बाबूजींनी अनेक चॅरिटी शोज करून मोठा निधी सरकारला पुनर्वसन कार्यासाठी उपलब्ध करून दिला. काही काळ ते ग्राहक चळवळीच्या मुंबई शाखेचे अध्यक्षही होते.

पुरस्कार आणि मानसन्मान

बाबूजींना अनेक मानसन्मान आणि पुरस्कार त्यांच्या जीवनकाळात मिळाले. त्यातील काही महत्त्वाच्या मानसन्मानांची व पुरस्कारांची माहिती पुढीलप्रमाणे:

१९६३पासून दरवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवात बाबूजींना सहा वेळा प्रपंच, संथ वाहते कृष्णामाई, आम्हीं जातो आमुच्या गावा, धाकटी बहिण, कार्तिकी आणि या सुखांनो या, या चित्रपटातील त्यांनी गायलेल्या गीतांसाठी सर्वोत्कृष्ट पार्श्वगायक म्हणून गौरविण्यात आलं.

१९६३पासून दरवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवात बाबूजींना प्रपंच आणि आम्हीं जातो अमुच्या गावा या चित्रपटाकरिता त्यांनी दिलेल्या उत्कृष्ट संगीतासाठी सर्वोत्कृष्ट संगीतकार म्हणून दोन वेळा गौरविण्यात आलं.

सुरसिंगार संसदतर्फे बाबूजींना त्यांनी दिलेल्या उत्कृष्ट संगीतासाठी प्रथम १९६८साली भाभी की चुडियाँसाठी आणि १९७०साली मुंबईचा जावई साठी सर्वोत्कृष्ट संगीतकाराला दिल्या जाणाऱ्या स्वामी हरिदास पुरस्काराने दोन वेळा गौरविण्यात आलं.

१९९६मध्ये मुंबईच्या उषःप्रभा प्रतिष्ठान तर्फे भारतीय चित्रपटासाठी दिलेल्या अनमोल योगदानाबद्दल 'कै. व्ही. शांताराम' यांच्या स्मरणार्थ देण्यात येणारं पारितोषिक देऊन गौरविण्यात आलं. त्याच वर्षी कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे संगीतक्षेत्रातील कामगिरीबद्दल 'गोदावरी पुरस्कार' देऊन गौरविण्यात आलं.

चतुरंग प्रतिष्ठानतर्फे सन्मानाचा समजला जाणारा 'जीवनगौरव' पुरस्कार देऊन बाबूजींचा गौरव करण्यात आला.

१९९८साली मा. दीनानाथांच्या ५६व्या पुण्यतिथी निमित्त प्रदीर्घ संगीत सेवेबद्दल आशा भोसले यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन बाबूजींचा गौरव करण्यात आला.

२००१साली बाबूजींना महाराष्ट्र शासनातर्फे प्रतिष्ठेचा समजला जाणारा 'लता मंगेशकर' पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं.

२९ जुलै २००२रोजी एक समर्पित स्वरतीर्थ नादब्रह्मात विलीन झाले. हिंदुत्व, संघ आणि सावरकर या त्रिवेणी संगमावर या साधकाने ८३ वर्षे तपस्वी जीवनाची साधना केली. बाबूजींच्या निधनानंतर २००३ साली महाराष्ट्र शासनाने बोरीवली आणि दहिसर या भागांना जोडण्याऱ्या उड्डाणपुलाचं 'सुधीर फडके उड्डाणपूल' असं नामकरण करून या महान संगीतकाराला मानवंदना दिली. दादरा नगरहवेली, सशस्त्र मुक्तिसंग्रामातील नेतृत्व, ग्राहक पंचायतीच्या चळवळीत झोकून स्वीकारलेले अध्यक्षपद, सावरकर चित्रपटाचा ध्यास अशा देदीप्यमान घटना घडविणाऱ्या या कर्मयोग्याला शतशः प्रणाम!

स्रोत: माहितीचे आंतरजाल

बाबूजी... सूर आले दुरुनी, मन जाई भरुनी

बाबूजी .. म्हणजे सुधीर फडके .. मराठी संगीतातील एक अविभाज्य नाव .. जगभरातील मराठी रसिकांच्या मनातला - भावविश्वातला एक हळवा कोपरा आपल्या स्वर्गीय आवाजाने भारावून टाकणारे आणि स्वरतालबध्द तसंच कायम गुणगुणत रहावं असं वाटणाऱ्या चाली बांधणारे - गेल्या अनेक पिढ्यातील रसिकांच्या गळ्यातील ताईत व अनेक उदयोन्मुख गायक-गायिकांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष गुरू असलेले गायक व संगीतकार म्हणजे आपले बाबूजी - सुधीर फडके!

अनेक अजरामर, अविनाशी, अवीट गोड चालींची गीते देणाऱ्या बाबूजींचा जन्म २५ जुलै १९१९रोजी कोल्हापूरला झाला. त्यांचं मूळ नाव राम फडके. संगीतकार व गायक म्हणून एचएमव्हीमध्ये आणि चित्रपटांत काम करायला लागल्यावर त्यांना सुधीर फडके म्हणून जग ओळखायला लागले. २०१९साली त्यांनी वयाची शंभर वर्ष पूर्ण केली असती, पण २९ जुलै २००२रोजी वयाच्या ८३व्या वर्षी जगाचा निरोप घेणाऱ्या बाबूजींची गाणी आणि त्यातलं वैविध्य आज एवढ्या वर्षांनंतरही तेवढंच मोहवून टाकतं आणि आणखी शेकडो वर्षे मोहवत राहील. त्यांनी संगीतबद्ध केलेली, गायलेली गाणी लहानपणापासून ऐकत आलोय. सुरुवातीला ती गाणी, त्यातल्या अवीट गोडीच्या सुरांमुळे, सहजसुंदर चालींमुळे भावली. थोडंसं कळायला लागल्यावर त्याच गाण्यांमधली ती अवीट गोडी तिच्या मर्मासकट, बाबूजींच्या संगीतातील अफाट-अजोड सामर्थ्यासकट आणि सहजतेसकट समोर येत राहिली आणि अजूनही येत राहतात. त्यांचं प्रत्येक गाणं हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे; हे पुरेपूर पटलं. गाण्याची एकेक ओळ सुरांच्या माळेत ओवताना, स्वर-रागांबरोबर आपणही त्यांच्याच रंगात रंगून जातो आणि बाबूजींच्या अचाट तयारीला व ताकदीला पाहून भारावून जातो.

पण ही ताकद, ही तयारी सहज आलेली नाही - त्यात बाबूजींची खडतर तपश्चर्या होती, अभ्यास होता. ''जगाच्या पाठीवर'' हे त्यांचं आत्मचरित्र वाचल्यावर कळतं की घरच्या बेताच्या - काहीशा हलाखीच्या परिस्थितीतून अनेकदा चणे-फुटाणे खाऊन, अनेकदा अपमान मनातल्या मनात पचवून, प्रसंगी निर्वासितांसारखे राहून, प्रचंड कष्ट करून एखादा ध्येयवेडा माणूस आपलं लक्ष्य कसं साध्य करू शकतो. आणि या सर्वातून जाऊनही गाताना - बोलताना, सतत त्यांच्या चेहऱ्यावर एक स्मितहास्य असे, प्रेमळ भाव दिसे आणि नकळत त्यांच्याबद्दल आपुलकी वाटायला लागली. त्यांच्या गाण्यातील स्पष्ट शब्दोच्चार हा अट्टाहास न वाटता गीतातील भाव, त्यातला अर्थ स्पष्टपणे रसिकांपर्यंत पोचावा - त्यातली आर्तता मनाला भिडावी यासाठी होता हे आपण जाणलं पाहिजे. हे सहज आत्मसात करता येत नाही. त्यासाठी वर म्हणल्याप्रमाणे तपश्चर्या तर आहेच, शिवाय एक कडक शिस्तही. आणि याच आपुलकी, प्रेमभाव आणि शिस्तीमुळे सुधीर फडके हे घराघरातल्या प्रत्येकाचेच बाबूजी झाले असे वाटते.

त्यांचं प्रत्येक गाणं हे आपल्याला समाधी अवस्थेत नेतं - मग ते ''समाधी साधन संजीवन नाम'' (https://youtu.be/BGzw9LRUclM) असो वा ''गुरु एक जगी त्राता'' (https://youtu.be/8cLOJBT_pSo). . ''देहाची तिजोरी'' (https://youtu.be/ALrZxOPx3DA), असो वा ''देव देव्हाऱ्यात नाही'' (https://youtu.be/1EmVD_1ofyc), ''विठ्ठला तू वेडा कुंभार'' (https://youtu.be/EeNd0JJbM-U) असो वा ''संथ वाहते कृष्णामाई'' (https://youtu.be/D-3kMbeNu6k), - - त्यांचं प्रत्येक भक्तीगीत ऐकताना आपण पवित्र भक्तिरसात न्हाऊन निघतो. त्यांनी स्वतः संगीतबद्ध केलेलं गीत असो वा दत्ता डावजेकर, यशवंत देव अशा संगीतकारांकडे ते गात असोत, तेवढ्याच तन्मयतेने ते गाताना दिसतात.

त्यांच्या चित्रपट गीतातही वास्तवता दिसायची. ''हवास मज तू हवास तू'' हे उडत्या चालीचं गीत असलं तरी ते मनाला भिडतं. ''रूपास भाळलो मी'', ''चंद्र आहे साक्षीला'', ''धुंदी कळ्यांना'' अशा गीतातून आपल्याला प्रेमाची वेगळीच हळुवार भावना जाणवते. चित्र समोर नसतानाही ''त्या तिथं पलीकडे'' गाणं ऐकताना आपल्याला ''प्रियेची झोपडी'' दिसायला लागते.

''जेथे राघव तेथे सीता'', ''मज सांग लक्ष्मणा जाऊ कुठे?'' सारखी विरह गीतं असोत किंवा ''मानवतेचे मंदिर माझे'', ''यशवंत हो जयवंत हो'' किंवा ''बलसागर भारत होवा'' अशी स्फूर्तीगीतं असोत किंवा ''कुणीतरी बोलवा दाजिबाला'', ''जाळीमंदी पिकली करवंद'' किंवा ''जाऊ द्या सोडा'' सारख्या

लावण्या असोत, त्यांनी किती कमाल बनवल्या आहेत. ''तोच चंद्रमा नभात'' सारख्या गाण्यात कुठं कसं थांबायचं, शब्दांत एक भाव-एक आस कशी उतरवायची याचा एक अत्युच्च अनुभव बाबूजी देतात.

त्यांच्या गीतरामायणाबद्दल काय बोलायचं? ''स्वये श्री रामप्रभू ऐकती'', ''दशरथा घे हे पायसदान'', ''मार ही त्राटिका'' आणि सर्वच गाणी ऐकून सगळं रामायणच डोळ्यासमोर उभं राहतं. ''पराधीन आहे जगती'' ऐकून क्वचितच एखादा असेल की ज्याच्या डोळ्यांत अश्रू येत नसतील.

''ज्योती कलश झलके'', ''आज पहिली तारीख है'', ''ओ माँ, तेरी सुरतसे अलग'' अशी अनेक हिंदी गीतं आपण ऐकतो. आशा भोसले-लताजी-माणिक वर्मा-पं. जितेंद्र अभिषेकी-पं. वसंतराव देशपांडे-सुरेश वाडकर-जयवंत कुलकर्णी-रवींद्र साठेंपासून अगदी रफी-किशोरकुमार पर्यंत सर्वांबरोबर त्यांनी गाणी केली. मुकेश, मन्ना डे, सुमन कल्याणपूर, जयवंत कुलकर्णी, अनुराधा पौडवाल, श्यामराव कांबळे, प्रभाकर जोग, सेबॅस्टिअन आणि तबलजी केशवराव बडगे, चंद्रकांत नाईक, अण्णा जोशी, ढोलकीवादक गंगावणे अशा अनेकांबरोबर त्यांनी काम केलंय, आपली पत्नी ललिता आणि पुत्र श्रीधर फडके यांच्याबरोबरही.

बाबूजींची गाणी ही सर्व वयोगटातल्या रसिकांना भावणारी आहेत. काही संगीतकार किंवा गायक हे तरुणांमध्ये लोकप्रिय असतात तर काही वरिष्ठ वयोगटात आणि ते त्या त्या वयोगटातच लोकप्रिय राहतात. परंतु बाबूजींची लोकप्रियता ही सर्व वयोगटात आहे, म्हणूनच ती कालातीत आहेत.

संगीत आणि गायनाबरोबरच राष्ट्रहित व सामाजिक विषयांचंही त्यांना भान होतं. गोव्याचे स्वातंत्र्यवीर मोहन रानडे यांच्या सुटकेसाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक होते आणि सावरकरांचे निस्सीम भक्त होते. दादरा-नगर हवेलीच्या मुक्तीसंग्रामात त्यांनी भाग घेतला होता. अनेक सामाजिक कार्यांसाठी निधी उभा करण्याकरिता त्यांनी गीतरामायणाचे अनेक कार्यक्रम केले. ग्राहक पंचायतीचे ते पहिले अध्यक्ष होते. स्वातंत्र्यवीर सावरकरांवर चित्रपट काढण्याचं स्वप्न त्यांनी पाहिलं आणि ते त्यांनी पूर्णही केलं!!

बाबूजींची गीतं अंतरंगातून, मनाच्या तळापासून येतात त्यामुळेच ती मनाला भिडतात. त्यातली उत्कटता, त्यातले सूर सहजपणे मनाला भिडतात आणि म्हणूनच जेव्हा ''सूर लागू दे'' हे बाबूजींचे स्वर कानांवर पडले की तिन्ही लोकांत मनं आनंदाने भरून जातात - भरून जात राहतील!!!

बाबूजींची गाणी कितीही वेळा ऐकली तरीही मन भरत नाही - याचमुळेच

१. त्यांची काही खास गाणी -https://youtu.be/3KOwiWDLZos
२. दूरदर्शनच्या संग्रहातील बाबूजींच्या व्यक्तिमत्वावर आधारित लघुपट.. https://youtu.be/6BEr4XQr3tY
३. रोटरी सहवास मध्ये ॲन मधुरा गोडबोले यांच्याबरोबर गायलेलं गाणं, चंद्र आहे साक्षीला खास तुमच्यासाठी https://youtu.be/AW2FAzo7wQg

राहुल लाळे

वाचू आनंदे

Rotary Club of Pune Sahawas is grateful to Samrajya Co-op Housing Society, Kothrud and Mr. Purushottam Deshpande for their gracious gift of loads of Library books and Rs. 10,000 for purchase of Sports goods for Dnyanda Prashala, Kirkatwadi. Mrs. Maya Deshpande (wife of Mr. Purushottam Deshpande, who is celebrating his 75th Birthday today) and Mrs. Shailja from Samrajya Society were specially present on this occasion. It was wonderful goodwill gesture from Deshpande family and Samrajya Society and thanks to our Rtn. Prakash Avachat for his coordination in arranging this impactful event enhancing the image of RCPS. As is well-known, our Rtn. Prakash Avachat is already conducting computer literacy programm, handwriting improvements classes and Mathematics skills enhancement exercises in this school. It was duly acknowledged by the Principal Mr. Limbraj Khune in his speech. Our *हिरकणी ग्रुप* also felicitated Rtn. Manisha Bhosale on her birthday, at Ajinkya Dedge School, Nanded Phata. Yet another Sahawas Initiative by Foundation team.

Our Charter President Mr. Shekhar Takalkar, Rtn. Prakash Avachat, Rtn. Pratibha Jagdale, First lady Aparna and Ann. Pooja Kulkarni attended the function

Finally it's all about *सहभाग, सहयोग और सहवास*

Rtn. Ajay Mutatkar
President, RCP Sahawas

Shrirang

Prakash

तुम जियो
हजारो साल !
सालके दिन हो
पचास हजार !!

Manisha

Mugdha

Yoga for Harmony & Peace

आंतरराष्ट्रीय योग दिन

२१ जून २०१५ रोजी मोदीजींनी 'आंतरराष्ट्रीय योग दिन' जाहीर केल्यापासून आपण सगळ्यांनीच दरवर्षी कुठे ना कुठे अशा कार्यक्रमाला हजेरी लावली असेल. निदान घरी तरी काही तरी योगासनं करून बघीतली असतील याची मला खात्री आहे.

यंदा कर्वेनगर येथील 'वेदांत सांस्कृतिक मंचा'ने हा कार्यक्रम 'श्री संकल्प सामाजिक प्रतिष्ठन'च्या सहकार्याने राजाराम पुलाजवळील 'महालक्ष्मी लॉन्स' येथे २१ जून २०२२ रोजी आयोजित केला होता. कार्यक्रमासाठी कर्वेनगर परिसरातील सुमारे २०० नागरिक, आठवड्याचा दिवस असूनही उपस्थित होते.

मनालीताई देव यांच्या शालेय विद्यार्थिनींची कलात्मक योगासने, अलकाताई जाधव आणि विनायक मुसळे सर यांनी केलेली विविध आसनांची प्रत्यक्षिके, मुसळे सरांनी उपस्थितांकडून करून घेतलेली आयुष मंत्रालयानी सुचवलेली आसने, योगाचार्य केदार पारगावकरांनी विषद केलेले वैद्यकीय योगाचे महत्त्व आणि मनोज साळी सरांनी सांगितलेले शास्त्रीय सूर्यनमस्काराची माहिती असे भरगच्च कार्यक्रम सादर केले गेले.

या कार्यक्रमाचे सूत्र संचालन आपल्या क्लबच्या ॲन जयश्रीताई धुपकर यांनी केले होते, तसेच या कार्यक्रमाच्या आयोजनातही त्यांचे महत्त्वाचे योगदान होते.

आपल्या क्लबच्या ॲन जयश्री ताई धुपकर यांनी १९९९मध्ये 'योगसाधना' या संस्थेतून 'योगपारंगत' हा पदविका अभ्यासक्रम पूर्ण करून योगवर्ग घेण्यास सुरुवात केली. १९९९-२०१३पर्यंत मार्केटयार्ड परिसरातील महिलांसाठी वर्ग चालवले. त्यामध्ये ५ ते ६० वर्षे वयोगटतील मुली-महिलांचा सहभाग असायचा. २०१३मध्ये त्या कर्वेनगर परिसरात रहायला आल्या. २०१३पासून आजतागायत त्या फक्त ज्येष्ठ महिलांकरता विनामूल्य योगवर्ग चालवीत आहेत. याबद्दल २१ जून २०२२ रोजी योगसधना संस्थेतर्फे सन्मानचिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. रोटरी क्लब ऑफ पुणे सहवास परिवारातर्फे ॲन जयश्रीताईं धुपकर यांचे मन:पूर्वक अभिनंदन!

विठ्ठल -एक ऊर्जास्रोत

विठ्ठल या शब्दामुळे, विठ्ठल शब्द उच्चारण्यामुळे, विठ्ठल नामाच्या टाहोमुळे, तनमनात एक विलक्षण आत्मविश्वास जागृत होतो. चैतन्याची निर्मिती होते. हजारो लाखो वारकरी तहान भूक विसरून विठ्ठलनामाचा गजर करत पंढरीची वारी करतात. गावागावातले आबालवृद्ध विठ्ठलनाम जपत पालखीत सामील होतात व वारकऱ्यांची सेवा करतात. यंदा, तसंच मागच्या वर्षी करोनाच्या संकटामुळे वारकरी वारीला जाऊ शकलेले नाहीत, पण मनानं ते आज आषाढी एकादशीला पंढरीला पोचले आहेत आणि विठूनामाच्या गजरात दंग आहेत. विठ्ठल विठ्ठल विठ्ठल असा तीन वेळा उच्चार केला तरी निर्माण होणारी उर्जा आणि तिच्या अनुभूतीचे वर्णन अनेकांनी विविध प्रकारे केले आहे.हृदयविकाराचा झटका आलेल्याने विठ्ठल नामाचा गजर प्रथमोपचार म्हणून करावा असे आपण वाचले असेलच...त्याविषयी सोशल मीडियावरही ऑडियो ..विझ्युअल स्वरूपात पाहिले असेल.

अनेक संत -कवी प्रभृतींनी लिहिलेले आणि भीमसेनजी-लता-आशा- बाबूजी- वसंतराव - किशोरीताई इत्यादि दिग्गजांनी गायलेले विठ्ठलाचे अभंग - भक्तिगीते आपण भावभक्तीने ऐकतो - गुणगुणतो. या विठ्ठल भक्तिगीतांचे, अभंगांचे आणि संत साहित्याचे अध्ययन वर्षानुवर्षे होत आहे, होत राहिल.

विठ्ठल - या शब्दाचा शब्दशः अर्थ विटेवर स्थल - वीटेवर स्थित. विठ्ठलनामाचा उद्घोषही किती वेगवेगळ्या पध्दतीने होतो - कुणी त्याला विठोबा म्हणतात तर कुणी विठू माऊली, ज्ञानेश्वर त्याला माझी विठाई तर तुकारामांची आवडी त्याला विठ्या आणी काही बाही म्हणते. कुणासाठी तो पांडुरंग आहे तर कुणासाठी पंढरीनाथ आहे. एका रचनेत त्याला पंढरीचा चोर तर एकात चक्क त्याला पंढरीचे भूत म्हटले आहे.

विष्णूसहस्रनामाप्रमाणे १६८ श्लोकांचे विठ्ठलसहस्रनाम हस्तलिखितात आहे असे मी कुठेतरी वाचले होते. विठ्ठलाची नावे द्वारकेश्वर, मुरलीधर, गिरीधर, कमलाबंधूसुखदा, पद्मावतीप्रियः, गोपीजनवल्लभ अशी कृष्णाशी मिळती जुळती आहेत.

कुणी त्याला काही म्हणो , महाराष्ट्रात शेकडो वर्षे विठ्ठलाची आणि विठ्ठलनामाची ऊर्जा जनतेला जागृत करत आहे आणि देश परदेशातील विद्वान विठ्ठलभक्तीने भारावून जाऊन वारीला जाणाऱ्या वारकरी संप्रदायाचा अभ्यास

करत आहेत.
विठ्ठलाच्या दर्शनासाठी आसुसलेल्या या लोकयात्रेत कितीही बाधा आल्या तरीही वारकरी भक्तांमध्ये जात पात नाही, उच्च-नीच नाही, गरीब-श्रीमंत कुठलाच भेदभाव नाही. विठ्ठल म्हणजे प्रेम, दया, माया, शांती यांचा मिलाफ.
विठ्ठल म्हणजे वासनेचा नाश आणि विकारांवर विजय. विठ्ठल म्हणजेच बंधुभाव विठ्ठल म्हणजेच सुखसमाधान, समता व समृद्धी.
लहानपणापासून गेली अनेक वर्षे आषाढात ग्यानबा तुकारामांच्या पालखीचे दर्शन चुकले नाही...गेली काही वर्षे वारीत टप्प्याटप्प्याने का होईना सहभागी होऊन भक्तिरसात न्हाऊन निघून ग्यानबा तुकारामांच्या व विठूमाऊलीच्या गजरात दंग झालो आहे.
मागील दोन वर्षे प्रत्यक्ष वारीत जरी सहभागी होता नाही आलं तरी, जवळंच विठ्ठलवाडीत जाऊन विठुरायाच्या देवळाचं बाहेरुन दर्शन घेऊन आलो होतो. या वर्षी मात्र परत सासवड ते जेजुरी हा वारीचा टप्पा मित्रमंडळींबरोबर पार केला आणि हरीपाठ भजनांवर ताल धरुन भक्तिरसात न्हाऊन आलो.
विठ्ठल-विठ्ठल गजरात आज पंढरीच काय, आख्खा महाराष्ट्र - प्रत्येक मराठी आणि अमराठी विठ्ठलभक्त मनोमनी बुडून गेला आहे आणि हाच विठुराया आपल्याला या परीक्षेच्या काळातून तारणार आहे.
हीच श्रद्धा व विश्वास मनात बाळगून प्रत्येक वारकरी , मराठी माणूस पुढची शेकडो वर्षे भजत रहाणार आहे....
.

आतां कोठें धावे मन| तुझे चरण देखलिया ||१||
भाग गेला सीण गेला | अवघा जाला आनंद ||२||
प्रेमरसें बैसली मिठी | आवडी लाठी मुखाशी ||३||
तुका म्हणे आम्हां जोगें | विठ्ठला घोगें खरें माप ||४||

पांडुरंग हरी वासुदेव हरी...
विठ्ठल विठ्ठल | जय हरी विठ्ठल ||

राहुल लाळे,
आषाढी एकादशी

Rotary District Conference 2023
21 & 22 Jan 2023
Aamby Vally, Lonavala
For Booking & Other Details
Contact our Club Rtn. Kiran Ingle

We meet at Dnyanada Prashala,
DP Road, Karvenagar,
Every Friday at 7.30 pm.

गुरु पौर्णिमा

सहवासीयहो,

आजच्या गुरुपौर्णिमेचा

कार्यक्रम "श्रीमद् भगवद् गीतेचे माहात्म्य" या अंतर्गत डॉ. शिरीष लिमये यांनी कर्म, धर्म, अध्यात्म यांच्यावर जे ओघवतं भाषण केलं त्याने आपणा साऱ्यांबरोबरच मीही मंत्रमुग्ध झालो.

कर्माचं, कर्मफळाचं महत्त्व विषद करताना त्यांनी कर्मकांडाच्या, दांभिकपणाच्या वर्मावर जे बोट ठेवलंय, त्यामुळे आज आपल्या सर्वांनाच एक नवीन दृष्टी मिळाली असेल यात शंका नाही. वेदव्यास यांचा जन्मदिवस.. आषाढी शुद्ध पौर्णिमा म्हणजे गुरुपौर्णिमा असं सांगणाऱ्या डॉ. लिमयेंच्या विवेचनातून मला पुढील मुद्दे महत्त्वाचे वाटले..

- व्यास... हे नाव नाही तर पदवी आहे, त्यांच्या नावाने पवित्र होते ते व्यासपीठ !
- व्यास म्हणजे जणू हिंदूधर्माचे निर्मातेच ..ज्यांनी अठरा पुराणं, भागवत, महाभारत लिहिले आणि त्याची अनूभूती अजूनही आपण घेत आहोत, त्यातला महाभारत या ग्रंथात एक लाख श्लोक आहेत, म्हणजे रामायणाच्या चौपट.
- महाभारत..उच्च विचाराची माणसं वेळप्रसंगी किती नीच वागू शकतात हे सांगतो तर भगवद् गीता कर्माचं महत्व सांगते.
- विवेकानंदांनी वनातले संन्यासी जनात आणले..धर्माचा उपयोग कर्मात आणला.
- सनातन तत्व...सनातन... ज्याला विरोध होऊ शकत नाही असा
- यशस्वी कोण ?... मनावर ताबा असणारा, इंद्रियांच्या घोड्यांचा लगाम ज्याच्या हातात आहे तो खरा यशस्वी !
- १९६५-६० दरम्यान...टी. एस. इलियट या ब्रिटिश कवीला गीता शिकावीशी वाटली, पण आपल्याकडच्या सोकॉल्ड हुशार माणसाला वाटत नाही हे दुर्भाग्य.

– गीता... वारंवार सलग गीता गीता असं म्हणलं की त्यागी त्यागी असा उच्चार होतो... गीता म्हणजे त्याग.

– गीता... जास्तीत जास्त विकत घेतला जाणारा , वाचला जाणारा जगातील दुसरा ग्रंथ!

– विवेकानंदांनी मॅक्समुल्लर ला गीता भेट दिली होती.

– सुखदुःख समे कृत्वा ...म्हणजे सुखदुःख समान मानणे हे अध्यात्म !!

– अध्यात्म म्हणजे ...Changing oneself..Changing my vision to look at others

–अध्यात्मात प्रगती कुठली?... अध्यात्म म्हणजे गती थांबवायची आहे.

– टिळकांनी तुरुंगात गीतारहस्य हा ग्रंथ लिहिला, गीता अशी आत्मसात की पुन्हा न पहाता लिहून काढतील.

– गीतेत मनाला उभारी देणारे श्लोक, त्यामुळेच स्वातंत्र्य सेनानी घडले.

...गीता म्हणजे पाचवा वेद... पंचम वेद..वेदांचा शेवटचा भाग...उपनिषदे...वेदांत

...उपनिषदांचं सार सांगणारा तो कृष्ण.

– शुध्द बुध्दीचा माणूसच गीता समजू शकतो.

– भगवानुवाच..गीतेत कृष्ण जे बोलतो ते .. जणू भगवंतांचेच विचार

– भागवतात मात्र श्रीकृष्ण उवाच...कृष्ण जे बोलतो ते .

– मनातल्या विचारांबरोबर वाहून न जाता, तटस्थपणे पहाणं, स्थिर राहणं हे गीतेचं सार, ते अध्यात्म

– कर्मात शरणागती हवी...हृदयात जाऊन वर्तनात येता आलं पाहिजे.

– विश्वास, भक्ती योग, कर्मयोग म्हणजे धर्म, म्हणजे अध्यात्म.

– समत्व म्हणजे योग...युज म्हणजेच ..जोडले जाणे, परमेश्वराशी जोडले जाणे म्हणजे योग!

– कर्माची संख्या वाढवणं म्हणजे कर्मयोग नाही... – कर्माला धर्माचं कवच असणं... म्हणजे कर्मयोग

– कर्म करताना इंद्रियांवर कंट्रोल हवा.

– वानप्रस्थाश्रम...withdrawlism – Detachment... ती कधी येणार?

– Children come through you but not from you – ते भगवंताचं देणं

–देव कुठल्या स्वरूपात समोर येईल माहीत नाही, त्यामुळे समोर येईल ती प्रत्येक व्यक्ती म्हणजे देव

– निर्हेतुक, तटस्थ होऊन कर्म केले पाहिजे

– मध्यम मार्ग... निष्काम कर्म म्हणजे धर्म

– फळ आणता येत नाही, फळ येत असतं.

– कर्म वर्तमानकाळात... फळ भविष्यकाळात ..त्यामुळे कर्म करताना फळाचा विचार नको.

– कर्मावर लक्ष...फळावर नको, कर्माचं फळ.. व्यक्ती सापेक्ष

– सुख दुखते ते कसलं सुख?

–सर्व स्वीकार व्रत...मन बळकट करणे

– फळ हा प्रसाद...प्रसादाला quality मूल्य आहे quantity मूल्य नाही.

किती सुंदर विचार आहेत !

प्रत्येक विचारावर एक निबंध लिहिता येईल..

डॉ. शिरीष लिमयेंचा कार्यक्रम ठेवल्याबद्दल रो. सुधीर, रो. पल्लवी, ॲन धनश्रीचे आभार!

रो. हेमंतने करून दिलेली ओळख व ॲन तारिणीचे आभारप्रदर्शनातून केलेले गुरुपूजन प्रभावी!

गुरु साक्षात परब्रह्म...तस्मै श्री गुरवे नमः !!

नमस्कार!

राहुल लाळे

Service Above Self !
One Profits Most, Who Serves Best !

मौनांची भाषांतरे

आजचा मौनाची भाषांतरे हा संदीप खरे यांचा गांधीभवन मधे संपन्न झालेला कार्यक्रम फारच अप्रतिम झाला. संदीपजींच्या कवितांनी आणि खुसखुशीत भाषेत त्यांनी केलेल्या विवेचनामुळे रसिक प्रेक्षकांनी खचाखच भरलेला गांधीभवन सभागृह भारावून गेला.
रो. दिलीप कुंभोजकर व शुभदा ताम्हणकर यांनी सूत्रसंचालन करुन संदीपजींचे काव्यवाचन प्रवाही ठेवले. गांधीभवनच्या प्रेसिडेंट रो.पद्मजा जोशी, कर्वेनगरचे प्रेसिडेंट रो. डॉ दिलीप कुलकर्णी व आपल्या सहवासचे प्रेसिडेंट रो. अजयजी मुटाटकर यांच्या हस्ते संदीपजींना मानपत्र देण्यात आले. ॲन तारिणीने आभारप्रदर्शन केले.

सर्व रसिक प्रेक्षकांनी या कार्यक्रमाबद्दल गौरवोद्गार व्यक्त केले.

Three cheers for
अजयजी आणि रोटरी सहवास !!!

Attending good programs, listening to brilliant speakers etc in place like Pune is not uncommon. **When YOU arrange and organise such events,** it's different. We had such experience 19th. July 2022 in watching **संदीप खरे** in breaking his silence by rendering his poems in over- filling Gandhi Bhavan Hall in his program **मौनांची भाषांतरे.** It was Synergy program with RC Gandhi Bhawan and RC Karvenagar. We honoured Sandip Khare with कलागौरव पुरस्कार.The only way to bring Non-Rotarian to your fold is to show them your projects and invite them for your interesting, entertaining programs.

काही क्षणचित्रे

जशने–जोष

RI President's Visit to Pune



25th year of marriage of
RI President Jennifer Jones & Nick Krayacich
being celebrated in Indian Style in Pune

Rotary

IMAGINE ROTARY

आयोजन

RID 3131

Club Administration Seminar

Clubs will receive recognitions for effective Club Administration during Admin Seminar " **Aayojan** " **on 6th August evening.**

(Chief Guest)

Rtn. Aniruddha Roychowdhury
(Vice President)

Dr. Anil Parmar
(District Treasurer)

Rtn. Vivek Dixit
(District Chief Administrator)

The recognitions will be based on CPI from District Website

35 to 40 points - Silver Citation
41 to 50 points - Gold Citation
51 and above - Platinum Citation

Clubs will also be awarded for best bulletin in Print format and A/V format

- **Print format Best 3 - Silver medal**
- **A/V format Best 3 - Gold medal**

To get recognized you have to only upload your own bulletin on portal before **31st July**

Your Club - **Rotary Club of Pune Sahawas**
Co Host - **Rotary Club of Pune Phoenix**

Programs in August 2022

3rd Vidnyan Vahini Visit to Interact School
6th Club Admin Seminar
11th Raksha Bandhan at Paraplegic Center
12th RYE Students Meet
14th Synergy Program Shukrangan
15th Synergy Program 2
19th Mangalagaur
Details of Programs will be announced on Business Group

Hearty Congratulations Dear Shekharji Dhamale,
for receiving ***Idols of Maharashtra Awards*** from Sakal

नांदा सौख्यभरे !

रो. संतोष व ॲन सौ. स्वाती कोठाडिया यांचे सुपुत्र पुष्पल आणि श्री. देवाषिश व सौ. चित्रा गुहा यांच्या सुकन्या अनुश्री यांचा शुभविवाह २१ जुलै २०२२ रोजी घरगुती समारंभात संपन्न झाला. नवविवाहितांना रोटरी क्लबऑफ सहवासकडून हार्दिक शुभेच्छा!

औक्षवंत व्हा!

०२ ऑगस्ट- ॲन स्मिता गावसकर
०६ ऑगस्ट - ॲनेट इंद्रजित (रो. महेंद्र चित्ते यांचा सुपुत्र)
११ ऑगस्ट - ॲनेट कल्याणी (रो. विवेक गोखले यांची सुकन्या)
११ ऑगस्ट - ॲनेट पुष्पल (रो. संदेश कोठाडिया यांचा सुपुत्र)
१५ ऑगस्ट - ॲनेट शौर्य (रो. विजय मानकरी यांचा सुपुत्र)
१५ ऑगस्ट - ॲन अपर्णा मुटाटकर
१६ ऑगस्ट - रो. राहूल लाळे
१८ ऑगस्ट - ॲन मीना ढमाले
१८ ऑगस्ट - अण्णा धनेश शहा
२० ऑगस्ट - ॲन श्रद्धा पळसकर
२६ ऑगस्ट - ॲनेट शुभम् (रो. सुनिल बारसकर यांचा सुपुत्र)
२७ ऑगस्ट - ॲन अंतरा (रो. अनुराग फुले यांची सुकन्या)
२८ ऑगस्ट - ॲन ऐश्वर्या (रो. मिलिंद पंडित यांची सुकन्या)